# राज्य महिला आयोग #

राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम १९९० या कायद्या-नुसार राज्य सरकारने २५ जानेवारी १९९३ रोजी निर्णय घेऊन या आयोगाची स्थापना केली. हा आयोग संसद कायद्याद्वारे स्थापन झाल्यामुळे हा आयोग बिगर घटनात्मक आयोग म्हणून ओळखला जातो. राज्यातील महिलांच्या असणाऱ्या समस्या व त्यावर विविध उपाय-योजना सुचवण्यासाठी या आयोगाची स्थापना करण्यात आली.

# रचना →

* निर्णय → २५ जानेवारी १९९३
* स्थापना → २५ एप्रिल १९९३
* मुख्यालय → मुंबई
* मंत्रालय → महिला व बालविकास मंत्रालय
* सध्याचे अध्यक्ष → रुपाली चाकणकर
* ब्रीदवाक्य → समान हक्क
* मासिक → साद
* त्रैमासिक → ठिणगी
* १ अध्यक्ष व ५ सदस्य असतात.
* १ सदस्य सचिव → महाराष्ट्र पोलीस महासंचालक

* नेमणूक
* राजीनामा } राज्यपाल
* सेवाशर्ती

* बडतर्फ → राष्ट्रपती (सर्वोच्च न्यायालयाच्या शिफारशी करून)

* कार्यकाल → ३ वर्ष (पुर्नानियुक्तीस पात्र असतात)

* वेतन →
  - २,१५,०००/-
  - राज्याच्या संचित निधीतून दिला जातो.

# कार्ये :-

१) महिलांच्या हक्कांची गळचेपी होत असेल तर ते थांबवणे

२) महिला तुरुंगांना भेटी देऊन तेथील महिला कैद्यांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडणे.

३) घटनेतील तरतुदीनुसार महिलांना न्याय मिळवून देणे

४) महिलांच्या मासिक व त्रैमासिकातून समस्या दाखवून देणे

५) महिलांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये संधी उपलब्ध करून देणे.